International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# भारतीय संविधान : भारतीय लोकशाहीचा पाया

**प्रा. अशोक किसन वाकडे**

विज्ञान महाविद्यालय, सांगोला. ता- सांगोला ,जिल्हा – सोलापूर

**गोषवारा**

भारतीय संविधानानुसार भारताचे शासन आणि प्रशासन चालत असते, संविधानातील तरतूदीना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे संविधानामध्ये बदल घटनादुरुस्तीने केला जातो आवश्यक असणारे परिशिष्टे नव्व्याने जोडले जातात 1950 मध्ये संविधानामध्ये 395 कलमे होती आता सध्या संविधानात 465+ कलमे

आहेत.

परिचय

न्याय आणि सामाजिक न्यायाचा योग्य समन्वय ठेवणारी भारतातील सर्वोच्च संहिता म्हणजे राज्यघटना आहे. राज्यघटना म्हणजे स्वतंत्र राष्ट्राने आपल्या देशात कायद्याने स्थापन केलेल्या संस्था, त्यांची ध्येयधोरणे, कार्यक्षमता आणि मर्यादा निश्चित करणारी देशाच्या सर्वोच्च स्थानी असलेली राष्ट्रसंहीता. या संहितेच्या चौकटीत राहूनच देशाचा राज्यकारभार, प्रशासन, कायदा व सुव्यवस्था या सह सर्व क्षेत्रांचे व्यवस्थापन, संचलन व नियमन करणाऱ्या निश्चित मूल्यांना एकाच वेळी व्यक्ती, समाज, सरकार, राज्य आणि सार्वभौमत्वाला बांधणारी अत्युच्च अशी आचारसंहिता म्हणजेच त्या राष्ट्राचे संविधान असते. अशा सर्वोच्च स्थानी असलेल्या भारतीय राज्यघटनेचा प्रवास दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी ७१ वर्षांचा होतो आहे. या प्रवासाच्या निमित्ताने '२६ नोव्हेंबर' हा दिवस संपूर्ण भारतात 'संविधान 'दिन' म्हणून सर्वपरिचित झाला आहे. या दिनाचे औचित्य डोळ्यांसमोर ठेवून प्रस्तुत लेखाची मांडणी करीत असताना वर्तमान भारतीय संविधान निर्मितीच्या पाऊलखुणांचा शोध भारतीय स्वातंत्र्य आंदोलन आणि ब्रिटिशांचे राज्य यांच्या अंतर्विरोधातून पुढे आलेला सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, लोकशाही व मानवतावादी यासारख्या विविध अधिकारांच्या मागण्यांतून स्वतंत्र भारताच्या संविधानाच्या घटनात्मक प्रवास कसा पुढे आला.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतातील ब्रिटिशांची साम्राज्यवादी धोरणे आणि त्यातून भारतीयांना त्यांच्या उदारमतवाद आणि आधुनिक शिक्षणाचा झालेला परिचय हा भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाची दिशा निर्देशित करणारा ठरला. यातूनच भारतीय संविधान निर्मितीचा पाया बांधला गेला. त्या दिशेने सर्वप्रथम 1874 मध्ये महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या 'सार्वजनिक सभा' या व्यासपीठावरून भारतीयांच्या राजकीय हक्कांच्या मागणीचा मसुदा ब्रिटिश संसदेला पाठविला. या प्रस्तावात गोखले म्हणतात की, ब्रिटिश संसदेतील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये करण्यात येणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये भारतीय प्रतिनिधींना सभासदत्व देऊन त्यांना राजकीय हक्क देण्याची मागणी केली होती. भारतातून ब्रिटिशांकडे

संविधानिक मागणी करणारी ही पहिली मागणी होती. त्याच दरम्यान भारतात संघटित स्वरूपात राष्ट्रवादाने प्रेरित होऊन राष्ट्रीय कांग्रेस स्थापन करण्यात आली.या 'राष्ट्रीय काँग्रेस'च्या व्यासपीठावरुन ब्रिटिशांकडे भारतीयांनी वेगवेगळया अधिकारांची मागणी केली .स्वांतत्र्य आंदोलनाच्या वेगवेगळया स्वरुपात मागण्यात आलेल्या भारतीयांच्या मागण्या ब्रितिशाना नजरेआड करणे शक्य नव्हते. या मागण्यांची दाखल घेत इ.स. १८८९ मध्ये ब्रिटिश संसद सदस्य चार्ल्स ब्रेड लॉ यांनी ब्रिटनच्या संसदमध्ये भारतात राजकीय सुधारणा घडवून आणण्याबाबतचे एक खाजगी विधेयक मांडले. हे विधेयक म्हणजे भारतीय लोकांत व्यक्त झालेल्या लोकमतांचा विधायक विचार करणारे होते. जरी हे विधेयक ब्रिटिश संसदेने मान्य केले नसले. तरीही त्यातून भारतीयांना एक प्रेरणा मिळाली होती. या प्रेरणेतूनच पुढे १८९५ मध्ये भारतातील काही पुढाऱ्यांनी 'भारतीय राज्यघटनेचा कायदा' नावाचे एक प्रारूप तयार केले. यामध्ये भारतीयांना सार्वभौम सत्ता, कायद्याची सत्ता, न्यायसत्ता आणि या सर्व बाबीची अंमलबजावणी करण्याची सत्ता प्राप्त व्हावी. अशा तरतुदीचे हे प्रारूप होते. भारतीय लोकात आपल्या अधिकाराविषयीच्या मागण्यां जोर धरत होत्या.या भारतीयांच्या मागण्या ब्रिटिशांच्या लक्षात येऊ लागल्या. यातूनच भारतीय आणि ब्रिटिश सरकार यांच्यातील अंतर्विरोध दिवसेंदिवस वाढत गेला. पुढे भारतीयांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरूनच ब्रिटिशांकडे आपल्या हक्कच्या सनदशीर मागण्या करण्याचे जाहीर केले. अशी जाहीर मागणी सर्वप्रथम १९०६ च्या कोलकत्ता येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात करण्यात आली.ती मागणी म्हणजे 'भारताला स्वयंशासनाचा अधिकार' दिला पाहिजे. अशा मागणीचा प्रस्ताव या अधिवेशनात पारित करण्यात आला.तो ब्रिटिश सरकारकडे पाठवण्यात आला. या मागणीची दखल घेऊन तत्कालीन मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिण्डन यांनी १९१५ मध्ये खाजगीरित्या गोपाल कृष्ण गोखले यांना म्हणाले की, भारतीयांना नेमक्या सुधारणा व मागण्या हव्या आहेत. त्याबद्दल एक आराखडा तयार करून द्या. यावेळी त्या आराखड्यात 'भारताला प्रांतीय स्वायत्तता' आणि 'जबाबदार शासन पद्धती'बाबतच्या शिफारशी करण्यात आल्या. या गोखल्यांच्या शिफारशींचा अंतर्भाव पुढे १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यावर प्रकर्षाने जाणवतो. लोकमान्य टिळकांच्या मार्गदर्शनाखाली ॲनी बेझंट यांनी 'होमरूल चळवळ उभारली. होमरूल म्हणजे 'स्वयंशासन' या चळवळीने काँग्रेसला सूचित केले. १९१८ च्या राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनात 'भारताच्या स्वयंशासनाचा अधिकार' ब्रिटिश सरकारने मान्य करावा, असा ठराव पारित करावा. मग तो ब्रिटिश संसदेकडे पाठवावा. काँग्रेसने तो पाठवला. त्यानंतर ब्रिटिश सरकारच्या हालचाली वाढल्या. १९२४ मध्ये ब्रिटिशांचे गृहसचिव सर अलेक्झांडर मुडीमन यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली. या समितीने भारतीय शासन स्वायत्त असावे, ते जबाबदार असावे अशा राज्यघटनेची निर्मिती करून राज्यकारभार केला जावा. अशा शिफारसी ब्रिटिश सरकारला दिल्या. मुडीमन समितीच्या शिफारशीमुळे भारतीयांच्या आशा पल्लवीत झाल्या. इ.स. १९२५ ला सिमला येथे ॲनी बेझंटच्या नेतृत्वाखाली भारताच्या स्वातंत्र्याचा मसुदा तयार करण्यासाठी बैठक झाली. या समितीने तो मसुदा सरकारला पाठविला. हा आधार घेऊन ब्रिटिश संसद सदस्य जार्ज लन्सवरी यांनी दि. १७ डिसेंबर १९२५ रोजी ब्रिटिश संसदेत भारतीय स्वातंत्र्याचे खाजगी विधेयक सांडले. भारतीयांची स्वराज्याबाबतची वाढती मागणी लक्षात घेऊन ब्रिटिशांनी १९२७ मध्ये सर सायमन यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली. या समितीत भारतीय सदस्य नसल्यामुळे या समितीचा भारतीयांनी प्रखर विरोध

केला. त्याचवेळी पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने भारताच्या संविधानाचा कच्चा आराखडा तयार केला.तो दि. १० ऑगस्ट १९२८ ला सादर केला.

नेहरु रिपोटने स्वतंत्र भारताच्या संविधानाचा कच्चा आराखडा तयार केला. त्याच रिपोर्टचा आधार घेत दि. २ जानेवारी १९२९ ला संपन्न झालेल्या लाहोर अधिवेशनात राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावर '२६ जानेवारी' हा दिवस भारताला 'पूर्ण स्वराज्य' मागणी करणारा दिवस म्हणून तो देशभर पाळण्यात यावा. अशी प्रेरणा मिळाली. भारतीयांना स्वातंत्र्याबरोबर संविधानाच्या भवितव्याचा विचार स्वस्थ बसू देत नव्हता. त्याचे पडसाद १९३१ च्या कराची येथील काँग्रेस अधिवेशनात पडले. या अधिवेशनात भारतीयांचे मूलभूत हक्क, आर्थिक पुनर्रचना, अल्पसंख्याकांचे संरक्षण इ. विषयांसंदर्भात ठराव पारित केले. या निमित्ताने भारताच्या राज्यघटनेची मूलभूत चौकट निश्चित होत गेली.दिवसेंदिवस भारतीय स्वातंत्र्य आंदोलन अधिक गतिमान होऊ लागले. ब्रिटिशांवर दबाव वाढत चालला. १९३१ मध्ये लंडन येथे एक गोलमेज परिषद झाली. या परिषदेत सायमन कमिशन, नेहरू रिपोर्ट आणि गोलमेज परिषदांच्या चर्चेतून विविध विषय पुढे आले. त्यानंतर संवैधानिक विषयांवर भारतीयांच्या भावी राज्यव्यवस्थेची बांधणी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने 1933 साली लिनलिथगो यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशींनुसार ब्रिटिशांनी १९३५ चा प्रशासन कायदा तयार केला. हा कायदा पूर्णत: ब्रिटिशांच्या व्यूहरचनेतून करण्यात आल्यामुळे १९३६ च्या फैजपूरच्या काँग्रेस अधिवेशनात या कायद्याला भारतीयांनी विरोध केला. त्याऐवजी स्वतंत्र भारताची राज्यघटना असलेले राज्य हवे. ती घटना समितीची निर्मिती करून तयार करावी, असा ठराव पारित करण्यातआला. अशा प्रकारच्या स्वांतत्रतच्या मागण्याच्या विविध घडामोडींवरून ब्रिटिशांच्या लक्षात आले की, भारतीयांच्या स्वातंत्र्य आणि घटना निर्मितीच्या भावना दिवसेंदिवस प्रगल्भ होत आहेत. त्यांना स्वातंत्र्य दिल्याशिवाय पर्याय नाही. असे विधान १९४० मध्ये लार्ड लिनलिथगो यांनी केले. पुढे दोन वर्षांत भारताच्या राज्यघटनेबाबत चर्चा, विचार व अभ्यास करण्यासाठी मार्च १९४२ मध्ये ब्रिटिशांनी 'क्रिप्स मिशन' गठित केले. या मिशनने स्वतंत्र भारताच्या पुनर्रचनेसाठी भारताला वसाहतीचा दर्जा आणि घटना समितीची स्थापना करावी, अशा शिफारशी सुचविल्या. क्रिप्स मिशनच्या शिफारशींवर ब्रिटिश संसदेत चर्चा सुरू झाली. चर्चेदरम्यान डिसेंबर १९४५ मध्ये भारतमंत्री म्हणाले की, सध्या भारतात स्वातंत्र्य मागणीच्या चळवळीने अधिक वेग घेतला आहे. त्यांना स्वातंत्र्य देणे गरजेचे आहे. त्यासाठी ब्रिटिश सरकारने भारतात घटना समितीच्या निर्मितीचा निर्णय लवकरात लवकर अंमलात आणावा. लगेच संसदेने त्यास दुजोरा दिला. लॉर्ड वेवेल यांनी भारतात घटना निर्माण करण्यासाठी ब्रिटिशांनी एक समिती नेमावी. त्या समितीच्या मार्गदर्शनाखाली भारतात घटना समितीची स्थापना व्हावी, अशी शिफारस केली. त्याप्रमाणे'कॅबिनेट मिशन'ची स्थापना १९४६ मध्ये करण्यात आली. या मिशनने दि. १६ मे १९४६ ला आपला अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला. अखेर कॅबिनेट मिशनच्या शिफारशीने भारताची प्रदीर्घ काळापासून चालत आलेली मागणी पूर्णत्वास आली. घटना समिती म्हणजे भारताच्या भावी राज्यव्यवस्थेची विधायक संस्था होती. या संस्थेच्या निर्मितीसाठी १९४५ मध्ये प्रांतीय विधिमंडळाच्या प्रतिनिधींतून प्रतिनिधींची निवड करण्यात यावी, असा मध्यम मार्ग स्वीकारण्यात आला. अखेर घटना समितीसाठी ३८९ सदस्यांच्या निवडीने भारतीयांचे स्वप्न वास्तवात अवतरले. भावी भारताच्या

राज्यव्यवस्थेची बांधणी करण्याच्या प्रयत्नांना भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाने योग्य दिशा आणि विचार दिले. त्यातूनच जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या निवडणुका घेण्यात आल्या. ३८९ जागांपैकी २१२ जागा या काँग्रेस, ७३ जागा मुस्लिम लीग, अन्य जागेवर ११ प्रतिनिधी निवडून आले, ९३ जागा संस्थानांच्या सदस्यांसाठी नियुक्त झाल्या. घटना समितीवर देशातील स्वातंत्र्य लढ्याच्या अग्रगण्य स्थानी असलेले बहुतांश नेते निवडून देण्यात आले होते. घटना समितीवर काँग्रेसचे वर्चस्व असले. तरीही देशातील सर्व धर्म आणि समाजाचे प्रतिनिधीत्व, प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेले अभ्यासक, विधीतज्ज्ञ व बुद्धीवंतांचा समावेश असावा. असा काँग्रेसचा प्रयत्न होता. त्याचबरोबर या समितीत नऊ महिलां सदस्यांचाही समावेश होता.

घटना निर्मिती

भारताची घटना समिती म्हणजे अल्पावधीत निर्माण झालेली कृती नसून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील नेतृत्वाने राष्ट्रवादाच्या माध्यमातून त्याग आणि बलिदानाच्या लढ्याचे एक सुसंस्कृत अपत्य आहे. या निर्मितीस संपूर्ण भारतीयांच्या भावी राज्यव्यवस्थेबद्दलच्या आशा, आकांक्षा, स्वप्न, आदर्श, विचार, मूल्य, त्याग आणि बलिदानाचे नसामुदायिक अधिष्ठान भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातून ती प्राप्त झालेले होते. स्वतंत्र भारताचे स्वप्न हाती घेऊन घटना समितीच्या स्थापनेने भारताच्या संविधान निर्मितीला प्रारंभ झाला. पं. नेहरू, गोआय्यंगरपालस्वामी , प्रा. के.टी. शहा, धनंजय गाडगीळ, के, संस्थानम, बॅ. असफ अली, प्रा. हुमायून कबीर इ. प्रतिनिधींनी संविधानाच्या पूर्वतयारीसाठी जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या सल्लागारपदी श्री. बेनेगल नरसिंहराव (बी.एन. राव) यांची सर्वानुमते निवड केली . एक प्रकारे ब्रिटिश भारताला स्वातंत्र्य देण्याच्या तयारीत होते.तर दुसरीकडे भारताच्या संविधान निर्मितीची प्रक्रिया जोर पकडत होती. यासाठी पहिली बैठक दि. ९ डिसेंबर १९४६ रोजी सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीवर मुस्लिम लीगने बहिष्कार टाकला. लगेच दि. ११ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे स्थायी अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची निवड करण्यात आली. दि. ९ ते २३ डिसेंबर १९४६ पर्यंत चाललेल्या पहिल्या बैठकीत विविध विषयांची जबाबदारी पार पाडणाऱ्या २२ समित्या नियुक्त करण्यात आल्या. या विविध समित्यांनी जगातील बहुतांश राष्ट्रांच्या संविधानाचा सखोल अभ्यास केला.त्यातील भारतास अनुकूल असतील अशा तरतुदी संकलित केल्या. वेगवेगळया समित्याने दिलेल्या संकलित तरतुदींचा अभ्यास करून घटना समितीचे सल्लागार बी. एन. राव यांनी घटनेचा पहिला कच्चा आराखडा तयार केला. तो घटना समितीला दि. ३० एप्रिल १९४७ रोजी सादर केला. एकीकडे घटना समितीच्या कार्याला वेग वाढत होता तर दुसरीकडे भारताला स्वातंत्र्य देण्याबरोबर फाळणीची प्रक्रिया पूर्ण झाली. भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली. भारताला दि. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले.फाळणीमुळे घटना समितीवर निवडून आलेल्या अनेक सदस्यांचे सदस्यत्व रद्द झाले. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब . आंबेडकरांचाही समावेश होता. घटना समितीतील उपसमितीत काम करीत असताना डॉ. बाबासाहेबांच्या कामाची चुणूक घटना समितीला आली होती. घटना समितीत मुकुंदराव जयकरांच्या राजीनाम्याने एक जागा रिक्त होती. या रिक्त जागेवर फेरनियुक्त करण्यासाठी घटना समितीत बहुमत असलेल्या काँग्रेसने डॉ. बाबासाहेबांची नियुक्ती करण्याचे निश्चित केले. त्यावेळी घटना समितीत बहुमत असलेल्या काग्रेसला सहकार्य करण्याची मानसिकता डॉ. आंबेडकरांनी दर्शविली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जुलै १९४७ ला मुंबई

विधिमंडळातून बिनविरोध निवडले गेले. पुन्हा एकदा डॉ. बाबासाहेब घटना समितीचे सदस्य म्हणून कामाला लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होण्यापूर्वीच बी.एन. राव यांनी संविधानाचा कच्चा मसुदा तयार केलेला होता. या कच्च्या मसुद्याचे रूपांतर पक्क्या मसुद्यात करण्यासाठी दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी घटनेच्या मसुदा समितीची स्थापना केली. या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवड केली. त्यांना सहकार्य करण्यासाठी मसुदा समितीत अल्लादी कृष्णमाचारी, अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगर, के.एम. मुन्शी, बी.एन. मितल, डी.जी. खेतान या सहा सहकाऱ्यांची निवड करण्यात आली.मसुदा समितीने घटनेचा पहिला मसुदा फेब्रुवारी १९४८ ला घटना समितीला सादर केला. त्यावर सूचना व हरकतीसाठी सहा महिन्यांचा कालावधी दिला. पहिल्या मसुद्यावरील सूचना व हरकतींचा विचार करून ऑक्टोबर १९४८ मध्ये घटनेचा दुसरा मसुदा तयार केला. तो पुन्हा प्रसिद्धीसाठी ठेवण्यात आला. या मसुद्यावरही अनेक टीका-टिप्पणी प्राप्त झाल्या. हे सर्व लक्षात घेऊन भारतीय संविधानाचा अखेरचा आराखडा मसुदा समितीने दि. ४ नोव्हेंबर १९४८ ला घटना समितीला सादर केला. घटनेच्या अंतिम मसुद्याचे वाचन करण्यात आले. त्यावर सविस्तर पाच दिवस चर्चा झाली. आलेल्या सूचना आणि फेरबदलांचा अंतर्भाव करून संविधानाचे दुसरे वाचन दि. १५ नोव्हेंबर १९४८ ते १७ ऑक्टोबर १९४९ असे प्रदीर्घ चालले. दुसऱ्या वाचनानंतर सुद्धा ७६५३ सूचना संविधानात सुचविण्यात आल्या. त्यापैकी २४७३ दुरुस्त्यांवर घटना समितीत चर्चा करण्यास सहमती झाली .यानंतर भारतीय संविधानाचा अंतिम आराखडा तिसऱ्या वाचनासाठी दि. १४ नोव्हेंबर १९४९ ला घटना समितीत ठेवण्यात आला. त्यावरही प्रदीर्घ चर्चा झाली. अखेर दि. २६ नोव्हेंबर १९४९ ला भारताच्या संविधान निर्मितीचे संकल्प पूर्ण झाला. २६ नोव्हेंबर १९४९ संविधान सभेने भारताच्या संविधान निर्मितीला सर्वानुमते मान्यता दिली. २८९ सदस्यांपैकी २८४ सदस्यांनी भारतीय संविधानावर स्वाक्षरी केली. त्यावर स्वतंत्र भारताची राज्यघटना म्हणून शिक्कामोर्तब केले. सलग दोन वर्षे ११ महिने १७ दिवसांत अकरा अधिवेशने आणि १६५ बैठका घेऊन जगातील सर्वात मोठया लोकशाही राष्ट्राची राज्यघटना निर्मीतीचे काम पुर्ण झाले. या स्वतंत्र भारताच्या नव्या राज्यघतनेत एकूण ३९५ कलमे, ८ परिशिष्टे आणि २२ विभाग आहेत. संविधानाच्या निर्मितीने भारतीयांचे स्वराज्य व सुराज्याचे संकल्प पूर्णत्वास आले. या राष्ट्रीय संहितेची अमलबजावणी करण्याचा निर्णय घ्यायचा होता.त्यासाठी तिचे लोकार्पण दि. २६ जानेवारी १९५० पासून करण्याचे निश्चित झाले. असे असले तरी तिचे पूर्णत्व दि. २६ नोव्हेंबर १९४९ ला पूर्ण झाले. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो.

**सारांश,**

भारताचे संविधान हे भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातून भारतीय नागरिकांनी केलेल्या त्याग, बलिदान, आत्मविश्वास, इच्छा, आकांक्षा, मूल्ये अशा वाटचालीतून उदयास आलेले एक राष्ट्रीय दस्ताऐवज रुपी अपत्य आहे. यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनेकांचे योगदान लाभले आहे. विशेषत्वाने घटना समितीचे सल्लागार बी.एन.राव आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे यामध्ये अनन्य साधारण आहे. भारतीय संविधानाने जसा आजपर्यंतचा प्रवास साध्य केला.

संदर्भ :-

1. भारतीय संविधान - राष्ट्र की आधारशील - ग्रेनविल
2. भारताचे संविधान आणि कायदे - अभिजित शिंदे
3. भारताचे संविधान सुधारित प्रत
4. राज्यव्यवस्था भाग - I अभिजित राठोड
5. आपले संविधान (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह)- महेश राजाराम शिंदे
6. www.wikipedia .com
7. www.parliament .com